# बृहन्मुंबई महानगरपालिका

**माहितीपत्र**

क्र.प्रले/पापुमनि/अर्थसंकल्प/नप्र/१९ दि.११.०४.२०२२

विषय: अर्थसंकल्पीय अंदाज 'ग' (निधी संकेतांक : ४०) चे सन २०२१-२०२२ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज तसेच सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाची महापालिकेच्या स्तरावरील स्वीकृती.

संदर्भ : स्थायी समितीने दि.२२.०२.२०२२ रोजीच्या ठराव क्र.२१४२ अन्वये दिलेली मंजुरी.

.........

मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम १२६ ई (सुधारित) अन्वये स्थायी समितीस सादर करण्यात आलेल्या सन २०२१-२०२२ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजांना आणि सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांना कोणतेही बदल न करता स्थायी समितीने त्यांच्या दि.२२.०२.२०२२ रोजीच्या ठराव क्र.२१४२ अन्वये मंजुरी दिलेली होती. त्यानुसार मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम १२६ फ (३) अन्वये स्थायी समितीने मंजूर केलेले सन २०२१-२०२२ चे सुधारित तसेच सन २०२२-२०२३ चे अर्थसंकल्पीय अंदाज 'ग' महापालिकेस दि.०४.०३.२०२२ रोजी स्वीकृतीकरीता सादर करण्यात आलेले होते.

२. वरील प्रमाणे स्थायी समितीने सादर केलेले सन २०२१-२०२२ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज तसेच सन २०२२-२०२३ चे अर्थसंकल्पीय अंदाज 'ग' **महापालिकेने त्यात कोणतेही बदल न करता** उत्पन्नाची बाजू व खर्चाची बाजू दि.०४.०३.२०२२ रोजी बोलाविलेल्या बैठकीमध्ये स्वीकृत केलेले आहेत.

३. स्थायी समितीस सादर करण्यात आलेले सन २०२१-२०२२ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज तसेच सन २०२२-२०२३ वर्षाच्या अर्थसंकल्प 'ग' च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या संगणकीय प्रती सर्व खाते/विभागीय प्रमुखांना ह्या खात्यातर्फे यापूर्वीच वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

४. सर्व खाते/विभागीय प्रमुखांनी कृपया याची नोंद घ्यावी.

सही/- ११.०४.२०२२
**(रामदास क. आव्हाड)**
**प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.)**

---

क्र.प्रले/पापुमनि/अर्थसंकल्प/नप्र/१९ दि. ११.०४.२०२२

माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**(मोतीराम मारुती वाजे)**
**प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.) यांजकरिता**

Y:\A.O. Budget Word\Budget 2022-23\Circular 2022-23.doc